N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): पिंपरी-चिंचवड P.S.(ठाणे): दिघी Year (वर्ष): 2021

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0373 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 28/09/2021 04:12 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):

1. Day(दिवस): सोमवार

Time Period (कालावधी): पहर 5

Date From (दिनांक पासून): 27/09/2021

Date To ( दिनांक पर्यंत): 27/09/2021

Time From (वेळेपासून): 13:11 बजे

Time To (वेळेपर्यंत): 13:11 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक ): 28/09/2021 Time (वेळ): 03:16 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ

Entry No. (नोंद क्र.): 007 Date & Time (दिनांक आणि वेळ): 28/09/2021 03:16 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 3 किमी

Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): तलाठी कार्यालय च-होली बु,ता हवेली जि पुणे

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री स्वप्निल अशोक बुर्डे

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1990 (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.): Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | शास्त्री चौक, आळंदी रोड,राज सोसायटी,भोसरी पुणे 39,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | शास्त्री चौक, आळंदी रोड,राज सोसायटी,भोसरी पुणे 39,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-8888881995

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. मारुती अंकुश पवार | | | 1. तलाठी कार्यालय च-होली बु,ता हवेली जि पुणे ,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/ (मुल्य (रू. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 30,000/रुपये रोख रक्कम त्यामध्ये भारतीय चलनाच्या 2000 रु दराच्या 13नोटा व भारतीय चलनाच्या 500/रु द | 30, |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 30,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद ता.27/09/2021मी श्री स्वप्निल अशोक बुर्डे, वय 31 वर्षे धंदा- शेती, राहणार- शास्त्री चौक, आळंदी रोड, राज सोसायटी, भोसरी पुणे 39. मोक्र.8888881995.समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,मी वरिलप्रमाणे असुन, मी दि.22/09/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे लेखी तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे,आमची वडीलोपार्जीत शेतजमीन चहोली बु. ता.हवेली जि. पुणे येथे असून ती शेतजमीन माझे आजोबा ज्ञानेश्वर महादु बुर्डे यांच्या नावे होती. माझ्या आजोबांचा मृत्यु झाल्यामुळे मला वारस नोंद करायची होती म्हणून मी चहोली बु चे तलाठी मारुती अंकुश पवार यांच्याकडे जावून वारस नोंद विषयी चर्चा केली. त्यांनी मला वारस नोंद करण्यासाठी कागदपत्रे मागितले. मी कागदपत्रे जमा केली असता मला त्यांनी वारस नोंदीसाठी गुंठ्या प्रमाणे पैसे मागितले. मी पैसे देतो असे म्हणालो परंतु पैसे दिले नाहीत. वारस नोंद करण्यासाठी अनेक वेळा त्यांना विचारणा केल्यावर त्यांनी चुकीच्या पध्दतीने वारस नोंद केली. त्यात आमच्या जमिनीचा सर्वे नं 170,171 या मध्ये त्यांनी आमच्या वाटयाला येणारे क्षेत्र उडवुन टाकले व वारस नोंदीच्या समोर 00 असे क्षेत्र दाखवले आहे. मी तलाठी यांना चुकीच्या नोंदीबाबत विचारणा केली असता ते मला म्हणाले कि तुला 155 प्रमाणे चुक दुरुस्तीसाठी तहसीलदार यांना अर्ज करावा लागेल. त्यानंतर मी चार ते पाच दिवसांनी परत तलाठी यांचेकडे माझ्या आजोबाचे मृत्युपत्र नोंदवण्यासाठी व हक्कसोड पत्र नोंदवण्यासाठी गेलो होतो. त्यावेळेस माझ्या बरोबर माझा चुलत भाऊ चेतन चंद्रकांत बुर्डे होता. त्याला तलाठयांनी बाहेर थांबण्यास सांगीतले व मला त्यांनी वारस नोंदी केलेल्या कामाचे पैसे मागितले. मी पैसे देतो म्हणून वेळ मागितली. मी म्हणालो माझ्या या नोंदीचे काम करा मग मी तुम्हाला पैसे देतो त्यावेळी त्यांनी सांगीतले की, तुझे काम अवघड आहे पण तु मला तुझे कागदपत्रे दे मग मी तुला तुझे काम कसे व किती पैशात होईल ते सांगतो. त्यांनतर मी दोन दिवसांनी तलाठी यांच्याकडे मृत्युपत्राची सर्टिफाईड कपी व इतर कागदपत्रे जमा केले. त्यांनी कागदपत्रे ठेवून घेतले. त्यावर मी त्यांना पोचवर सह मागीतली असता त्यांनी पोच देण्यास नाकार दिला. त्यानंतर मी तलाठी यांना 20 ते 25 दिवस वारंवार मृत्युपत्र नोंदीबाबत विचारणा केली असता त्यांनी टाळाटाळ केली. त्यामुळे मी त्यांना नोंद का करत नाही असे विचारले असता त्यांनी सांगीतले की, मला वरती सुध्दा पैसे दयावे लागतात. तुला गुंठ्याला दोन हजार असे पैसे दयावे लागतील. किंवा 80 गुंठ्याचे एकत्रीत 1,50,000/- रुपये त्याच्या मोबाईल मधील कॅलक्युलेटरवर टाईप करुन दाखवुन त्याला देण्यास मला सांगीतले. त्यावर मी त्यांना बोललो की सर काही तरी कमी करा, त्या वेळेस ते हळु आवाजात म्हणाले की, मला 50,000/- रुपये दे व सर्कल कडे तु वरचे काम तुझ्या जबाबदारीवर नोंद मंजुर करुन घे. मी पैसे दिले नसल्याने त्यांनी वारस नोंद चुकीची घेतली व आजपर्यंत मृत्युपत्राची व हक्कसोड पत्राची नोंद केली नाही. उदया दि. 23/09/2021 रोजी माझ्या

कामासंबंधी तलाठी मारुती अंकुश पवार यांना भेटणार आहे. त्यांनी मागीतलेले पैसे ही लाच रक्कम आहे अशी माझी खात्री असल्याने त्यांचेवर आपल्या विभागाकडुन कारवाई करावी ही विनंती. तसेच माझ्यात व तलाठी मारुती अंकुश पवार असे दोघाच्यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार नाही.मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पोलीस उप अधिक्षक श्रीमती पवार मडम यांनी पडताळणी करणेकामी मला दि.23/09/2021 रोजी पंचासह रेकॉर्डर सोबत देवुन श्री. मारुती अंकुश पवार तलाठी चहोली बु यांना भेटण्यास पाठविले असता ते मिटींग करिता पुण्याला गेले असल्याने त्यांनी दि.24/09/2021 रोजी येण्यास कळविले. आमचे बोलणे व्हाईस रेकर्डरमध्ये संभाषण झालेले असुन तसा पंचनामा करण्यात आला आहे. दि.24/09/2021 रोजी मला पंचासह रेकॉर्डर लावून श्री. मारुती अंकुश पवार तलाठी चहोली बु यांना भेटण्यास पाठविले असता तलाठी पवार हे कार्यालयात उपलब्ध नसल्याने ते मिटिंग साठी तहसिल कार्यालय आकुर्डी येथे असल्याचे सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने खाजगी इसम शैलेश यांचा मला फोन आला व त्यांनी मला तलाठी कार्यालयातुन कागदपत्रे घेऊन तहसिल कार्यालय आकुर्डी येथे तलाठी पवार यांनी बोलविले असल्याचे सांगितले. मी तलाठी कार्यालयात जावुन कागदपत्रे घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यानंतर मला पुन्हा सुचना देऊन पडताळणी करणे कामी तहसिल कार्यालय आकुर्डी येथे रवाना केले. तहसिल कार्यालय आकुर्डी येथे माझ्यात व लोकसेवक पवार यांच्यात माझ्या कामाबाबत चर्चा झाली 50,000/- रुपये रक्कम जास्त होत असल्याने तडजोडी अंती 30,000/- रुपयेची तलाठी यांनी मागणी केली व फोन करुन येण्यास सांगितले. तसेच आता काही आणले आहेत का अशीही विचारणा केली. आमचे बोलणे व्हाईस रेकर्डरमध्ये संभाषण झालेले असुन तसा पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर सपोआ पवार मडम यांनी दि.27/09/2021 रोजी पुढील सापळा कारवाई करावी असे सांगितले. दि.27/09/2021 रोजी सापळा पथक दिप लन,दिघी येथे हजर झाले. मी तलाठी पवार यांना भेटणेबाबत फोन करुन विचारणा केली असता त्यांनी तलाठी कार्यालयात येत असून मला ही येणेबाबत सांगितले. त्यानंतर मी आणलेले 30,000/- रुपये हजर केले त्यास अँथ्रासिन पावडर लावुन पंचासमक्ष मला परत केले व्हाईस रेकर्डर चालू करुन माझे बनीयनचे आतील भागात कोणासही दिसणार नाही अशा पद्धतीने लावून पंचासह तलाठी कार्यालय चहोली बु येथे रवाना केले. तलाठी कार्यालयात पवार यांची पंचासमक्ष भेट घेतली व कामाची चर्चा करित असताना तलाठी यांनी हाताच्या इशा-याने लाच रक्कम आणली आहे का असे विचारुन लाच रक्कम हाताच्या इशा-याने टेबलच्या दोन नबर कप्यात ठेवण्यास सांगितले. थोडयाच वेळात तक्रारदार यांनी सपोआ पवार मडम यांना फोन करुन लोकसेवक यांनी त्यांचेकडुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्व नियोजित इशारा केला, ती वेळ 13.11 वा.ची होती. लोकसेवक श्री.पवार यांना आमची व सापळा पथकाची ओळख सांगुन, त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री. मारुती अकुंश पवार वय 41 वर्षे धंदा नोकरी तलाठी च-होली बु// ता. हवेली जि.पुणे रा.ठी. मु.पो.मेडद ता.माळशिरस जि.सोलापुर असे असल्याचे सांगितले.तरी मारुती अंकुश पवार तलाठी च-होली बु// यांनी वारस नोंद चुकीची दुरुस्ती,मृत्युपत्राची व हक्कसोड पत्राची नोंद यासाठी माझेकडे 50,000/- रुपयांची लाचेची मागणी करुन माझेकडुन 30,000/- रुपयांची लाच स्वीकारली. म्हणुन माझी मारुती अंकुश पवार तलाठी च-होली बु// यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.हा जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखित केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

13.Action **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Mohan Dadasaheb Shinde(I (Inspector)) / PCMH80643 or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

(87)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

S.M.Burade

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

ठाणे अमलदार

Name (नाव): Mohan Dadasaheb Shinde

Rank (पद): ... पिंपरी चिंचवड

No.(सं.): PCMH80643